(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार

**प्रा. नम्रताआ. निकम,** सहायक प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग, कमला कॉलेज कोल्हापूर.

**डॉ. उदय गौ. आठवले,** सहायक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, कमला कॉलेज कोल्हापूर.

---

**गोषवारा** –प्रस्तुत शोध-निबंधमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे विखुरलेले आर्थिक विचार एकत्रित करण्यात आलेले आहेत. शिवाय वर्तमान भारतीय आर्थिक स्थिति बघितली असता त्यामध्ये गांधीवादी अर्थशास्त्र कितपत उपयोगी पडते याचा आढावा घेण्यात आलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने आर्थिक विकास साध्य करित असताना ग्रामीण भागाला केंद्रस्थानी ठेवले असल्याचे दिसते. त्यामध्ये खादी उद्योगाला प्रोत्साहन देणे, कुटीर उद्योग यासारख्या ग्रामीण भागांशी निगडीत असलेल्या त्या कालखंडातील मूलभूत बाबीच्या विकासावर अधिक भर देताना दिसतात.

**सुचनक शब्द :** म. गांधी, आर्थिक विचार, अहिंसकअर्थव्यवस्था, कुटीर उद्योग, खादी उद्योग, खेडी, विश्वस्थ, ब्रेड लेबर, कामगार, साधेपणा.

शिवाय गांधीजी यांच्या आर्थिक विचारामध्ये सत्तेच्या आणि संसाधनाच्या वाटपाच्या संदर्भात विकेंद्रीकरणला अधिक महत्व असल्याचे दिसते. यातूनच सर्वसमावेशक विकास साध्य करता येणे शक्य असल्याचे त्यांनी आपले मत मांडले असल्याचे दिसते. त्यांच्या वागणूक विचार आणि आचरणांमध्ये सातत्याने समानता, त्याग, वैश्विक कुटुंब संरचना, स्वामित्व नाकारणे या सारख्या संकल्पनांचा सातत्याने उल्लेख होताना दिसतो. याचबरोबर विषमता निर्मूलन, लोक कल्याण, कामगारांचे कल्याण, अहिंसक औद्योगीक प्रगती, घटनात्मक मार्गाचा अवलंब यासारख्या आर्थिक विचाराशी जुळलेल्या संकल्पनांचा समावेश प्रस्तुत संशोधन – निबंधमध्ये करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत शोध- निबंध हा म. गांधी यांच्या आर्थिक विचाराशी निगडीत आहे. हे आर्थिक विचार जगभरामध्ये गांधीजी च्या नावाने "गांधीवादी आर्थिक विचार म्हणून ओळखल्या जातात. त्यामध्ये साधेपणा, अहिंसा, स्पर्धेचा हव्यास न करणे, संपत्ती संचय न करणे यासारख्या मानवतावादी तत्वज्ञानाचा समावेश होताना दिसतो. म. गांधी हे एक महान अर्थतज्ञ म्हणून नावलौकिकाला आलेले नसले तरी त्यांना भारतामध्ये एक महान समाजसुधारक आणि राजकीय विचारक म्हणून ओळखले जातात.त्यांनी सामाजिक सुधारणा करण्याच्या उद्देशाने जी आर्थिक तत्वे सांगितले ती पुढे गांधीजीचे आर्थिक विचार म्हणून प्रसिद्ध झालेत. म. गांधी यांचे आर्थिक विचार हे त्यांच्या भाषणामध्ये, धोरणआखणी व्यवहारात, आत्मचरित्र, पत्रव्यवहारामध्ये तसेच त्यांच्या समकालीन वृत्तपत्र लिखानावरून लक्षात येतात. एकंदरीत या सर्व द्वितीय साधनांचा वापर करुन गांधीजी यांचे आर्थिक विचार प्रस्तुत शोध-निबंधमध्ये एकत्रित मांडण्यात आलेत.

**प्रस्तावना-**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आपण एक महान नेता म्हणून ओळखतो. अहिंसा सारख्या तत्वांचा वापर करून त्यांनी भारताला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यास महत्वाची भूमिका बजावली. त्यांच्या या तत्वावरच आजतागत जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून आपले भारत एक राष्ट्र म्हणून उभे आहे. गांधीजीच्या या स्वातंत्र्य नेतृत्वामागे केवळ राजकीय उध्दार हा उद्देश नव्हता, तर समाजाचे सर्वांगीण भले होणे हा त्यामागचा मूळ हेतु असल्याचे दिसते.

यातूनच त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात आर्थिक घडामोडीवर तेवढाच भर दिला असल्याचे दिसते. गांधीजी यांनी जाणले होते की, भारताचे पारतंत्र्य हे फक्त राजकीय नसून ते बहुतांश आर्थिक गुलामगिरीतून निर्माण झालेले आहे. इंग्रजांनी भारतावर राज्य केले ते व्यापारातून आणि व्यापारातूनच भारत हा पारतंत्र्यामध्ये लोटल्या गेल्या. म्हणून गांधीजीनी स्वातंत्र्यलढ्यात स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार तसेच राष्ट्रीय शिक्षण यांचा वापर करून आर्थिक स्वातंत्र्य वा त्यातून राजकीय स्वातंत्र्य असा विचार केल्याचे आपल्याला दिसून येते.

गांधीजी हे काही अर्थतज्ञ नव्हते, मात्र त्यांच्या विचाराच्या कृतीतून त्यांनी जी शिदोरी दिली, त्याला "गांधीजी चे आर्थिक विचार" म्हणून ओळखल्या जाते. गांधीजीचा आर्थिक विचार हा भौतिकवादाला बाजूला करून आध्यात्मिक विकास व सुसंवाद वाढविणे यावर भर देतो. **गांधी अर्थशास्त्र**हा शब्द गांधीजीचे समर्थक असणारे 'जे. सी. कुमारप्पा' यांनी तयार केला होता.[१]

गांधीजी च्या विचारावर प्रामुख्याने प्रभाव दिसतो तो म्हणजे रस्कीन बॉड यांच्या 'अॅन टू धीस् लास्ट.' त्याचबरोबर टॉलस्टॉय यांच्या साधेपणा, समानता या तत्वज्ञाचा प्रभाव आपल्याला दिसून येतो. स्वातंत्र्य चळवळीमध्ये आपल्याला असे दिसून येते की, गांधीजीनी सुरू केलेल्या असहकार आंदोलनामध्ये, सविनय कायदेभंग चळवळीच्या मुळाशी

आर्थिक घटकाची जोड दिली होती. सविनय कायदेभंग चळवळीची सुरवातच ६ एप्रिल १९३० ला समुद्र किनाऱ्यावरील मीठ उचलून मिठावरील कर अमान्य करून झाला.[२] ही आपल्याला गांधीजीची अतिशय प्रबळ आर्थिक कृती असल्याचे दिसते. गरीबी, मागासलेपणा, आर्थिक विषमता यावर गांधीजीनी मंथन करून त्यावर स्वदेशी वस्तूचा उपभोग हा आर्थिक विचार समोर मांडला.

**गांधीजीच्या आर्थिक विचाराचे तत्वज्ञान**

म. गांधीजीचे आर्थिक विचार हे काही एका अर्थतज्ञा प्रमाणे मांडण्यात आलेले नाहीत. गांधीजीचे आर्थिक विचार हे साधेपणा, अहिंसा, विकेंद्रीकरण, नैतिक मूल्य यावर आधारलेले आहेत.[३]

गांधीजींना पाश्चिमात्य राष्ट्राची भौतिकवादावर आधारलेली अर्थव्यवस्था मान्य नव्हती. तर त्यांना नैतिकता, श्रमिक तसेच अध्यातमावर आधारलेली अर्थव्यवस्था अपेक्षित होती. गांधीजीनी समतावादाला अधिक महत्व देऊन मानवी प्रतिष्ठा जपली पाहिजे असे विचार मांडले.

गांधीजीनी स्थापन केलेल्या आश्रमतील जीवनशैलीवरून त्यांचे आर्थिक विचार हे अधिक स्पष्ट होतात. आश्रमातील रहवासी स्वत:चे अन्न, कपडे व राहण्याचे साधन तयार करण्याचा प्रयत्न करतील, तसेच स्वावलंबी जीवनशैली,वैयक्तीक आणि अध्यात्मिक विकास आणि व्यापक सामाजिक विकासासाठी कार्य करतील असे स्पष्ट केले होते.

**गांधीजींच्या आर्थिक विचाराची तत्वे -**

**१. आर्थिक कायदे –**

गांधीजीच्या मते, समाजाची भौतिक प्रगती होण्यासाठी व असामाजिक वर्गसंघर्ष कमी करण्यासाठी राष्ट्राचे आर्थिक कायदे हे निसर्गाच्या नियमानुसार तयार करायला हवेत. निसर्गाचे नियम हे सर्व ठिकाणी समान आहेत. मात्र अर्थशास्त्राचे नियम हे स्थलपरत्वे आणि कालपरत्वे बदलत असल्याचे दिसतात.[४]त्यामुळे ते प्रत्येक देशाच्या भौगोलिक परिस्थितीनुसार बदलतात. म्हणून सर्व मानवाच्या उध्दारासाठी निसर्गाचे नियम हे स्वीकारायला हवेत.

**२. अहिंसक अर्थव्यवस्था –**

गांधीजींचे जीवनाचे तत्वच 'अहिंसा' असल्याचे दिसते त्यामुळेच त्यांच्या अर्थशास्त्रीय विचारामध्ये विचारामध्ये आपल्याला अहिंसक तत्वांचा समावेश असल्याचे दिसते. मात्र आर्थिक क्रियामध्ये गांधीजीची पूर्ण अहिंसा लागू करणे शक्य नाही. कारण कोणतीही आर्थिक क्रिया, व्यवसाय यामध्ये थोडीफार हिंसा असल्याचे दिसते. मात्र त्यात कमतरता आणणे हे गांधीजीचे तत्व असल्याचे दिसते.

गांधीजीनी अहिंसक व्यवसायाची अशी व्याख्या केली की, "जो मुळभूतपणे हिंसे पासून मुक्त आहे किंवा ज्यांच्यात इतरविषयी शोषण किवा मत्सरतेची भावना नाही."[५]

गांधीजीचा भांडवलशाहीला विरोध असल्याचे दिसते. कारण भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये मानवाचे शोषण होण्याची अधिक संभावना असल्याचे दिसते. गांधीजीच्या मते, निसर्गाने मूलत: मानवाच्या गरजा ह्या पूर्ण केल्या आहेत. व प्रत्येकाने एवढेच उत्पादन करायला हवे ज्यामुळे त्यांची उपासमार होणार नाही. व अति गरीबीमध्येराहावे लागणार नाही.

३. **कुटीर उद्योग –** गांधीजी हे मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या औद्योगीकरनाच्या विरोधात होते. औद्योगीकरणामुळे आर्थिक व सामाजिक विषमता निर्माण होते. औद्योगीकरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर यंत्राचा वापर केल्या जातो. असे औद्योगीकरण हे एक क्षेत्रापुरते मर्यादित राहते.

भारतामध्ये मोठे मनुष्यबळ आहे व भांडवलाची कमतरता असल्याचे दिसते. त्यामुळे भारताने श्रमप्रधान तंत्राचा वापर करावा असे त्यांचे मत होते.[६] असे केल्याने एकतर रोजगारातील संधी वाढतील आणि अर्थव्यवस्था विकेन्द्रित बनेल.

कुटीर उद्योगामुळे व्यवसाय हे घराघरपर्यंत पोहचतील तसेच या उद्योगामध्ये भांडवल खर्च कमी असल्याकारणाने प्रत्येक व्यक्ती ही आवश्यक तेवढच उत्पादन घेणार. त्यामुळे अतिउत्पादन यासारखी समस्या निर्माण होणार नाही. व खेडी स्वयंपूर्ण होऊन लोकामध्ये वर्गसंघर्ष निर्माण होणार नाही.

**४. खादी उद्योग –**

गांधीजींनी जगाला दिलेली अजून एक अनमोल देणगी म्हणजे खादी. त्यांनी 'कताने स्वराज्य' भारताला मिळवून दिले. त्यामागे देखील त्यांचे आर्थिक विचार असल्याचे दिसतात. इंग्रजांनी कापड उद्योगाचा वापर करून भारताचे आर्थिक शोषण केले.

खादी उद्योगामुळे उत्पादनाचे विकेंद्रीकरण होते. तसेच मानवाला आवश्यक असणाऱ्या गरजा तो पूर्ण करू शकतो. खादी उद्योगांकरीता भांडवल अतिशय कमी लागते. तसेच हा उद्योग प्रत्येकामध्ये रोजगार निर्माण करण्याची क्षमता बाळगतो.

गांधीजीनी चरखा हा घरा-घरात पोहचविला व त्यामुळे स्वदेशी कंपडनिर्मिती जोरदार झाली. ज्याठिकाणी कापसाची निर्मिती होत नव्हती त्या ठिकाणी देखील लोकांनी कापसाची लागवड करून चरख्याच्या माध्यमातून खादीची निर्मिती केली असल्याचे दिसते. सध्या भेडसावणाऱ्या कापडाच्या आयातीवरील ही एक प्रभावी युक्ति ठरताना दिसते. परदेशी सूत आणि कापड आयंतीवर बंदी घालण्याचे त्यांनी सुचविले असल्याचे अनेक पुरावे आहेत.

**५. यंत्राचा वापर –**

गांधीजीच्या मते, यंत्राचा वापर हा भौतिक गरजा अधिक झाल्यामुळे होत असतो. भारतामध्ये श्रमिक मोठ्या प्रमानावर उपलब्ध असल्यामुळे त्यामुळे यंत्राचा वापर टाळल्या गेल्या पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले. त्यांच्या मते यंत्राच्या अतिरिक्त वापरामुळे श्रमिकांना आपला रोजगार गमवावा लागतो. गांधीजीच्या मते, यंत्राचा वापर हा कुटीर उद्योगांचा भार कमी करण्यासाठी व्हावा ना की, बेकरी आणि उपासमार वाढण्यासाठी.

गांधीजी यांचे असे म्हणणे होते की, 'गरजा पूर्ण करण्याकरिता जेव्हा हाथ कमी असतील तेव्हाच यांत्रिकीकरण करणे योग्य आहे''[७] पण जेव्हा आवश्यकतेपेक्षा काम करण्यास हाथ उपलब्ध असतांना त्यावेळी यांत्रिकीकरण करणे वाईट आहे. भारतामध्ये यांत्रिकीकरणाकरिता परिस्थिति अनुकूल नसल्याचे त्यांनी आपले मत मांडले. ते देशाला आर्थिकदृष्ट्या तोटयायाचे असल्याचे त्यांनी आपले मत मांडले.

**६. खेडे-**

गांधीजीनी सर्वोदय खेड्याचा आदर्श निर्माण केला. गांधीजी हे खेड्यांच्या संदर्भात असे म्हणतात की, खेडी ही खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण आहेत. तेथे उपभोगाकरिता आवश्यक असेल तेवढेच उत्पादन घेतल्या जाते. येथील समाज हा अहिंसक तत्वाने चालतो.

शेतीचा विकास, उद्योगाचे विकेंद्रीकरण होऊन सहकारच्या तत्वावर ग्रामीण भागांचा विकास व्हावा असे म. गांधीजी म्हणणे असल्याचे दिसते. गावाच्या विकासामध्ये गावातील सर्व स्तरातील लोकांचा सहभाग असणे गरजेचे असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

गावाच्या स्वयंपूर्ण विकासाकरिता काही अटीची पूर्तता होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले त्यामध्ये, अन्न वा वस्त्राच्या पुरवठ्याच्या संदर्भात खेडी ही स्वयंपूर्ण असायला हवीत. ग्रामीण उपक्रम हे सहकारच्या तत्वावर आधारित असायला हवी.[८]

**७. विश्वस्त सिद्धांत –**

एखाद्या व्यक्तीला जर वारसा हक्काने संपत्ती मिळाली किंवा उद्योगातून मोठा नफा झाला, तर ती संपूर्ण रक्कम त्यांच्या मालकीची नसते. ती संपूर्ण संमाजाची संपत्ती म्हणून ग्राह्य धरायला हवी. ती संपत्ती समाजाच्या कल्याणाकरिता खर्च केली पाहिजे. समाजातील आर्थिक विषमता संपवायची असल्यास तर भांडवलदारांनी कामगाराची विश्वस्त म्हणून काळजी घ्यायला हवी. त्यातूनच आदर्श समाजाची निर्मिती शक्य आहे.

गांधीजीच्या आर्थिक विचारानुसार उत्पादन हे गरजेनुसार ठरविल्या जाते. ना की, वैयक्तिक इच्छा कीवा लालसेपोटी. गांधीजी यांच्या मते, विश्वस्त संकल्पना ही समाजातील असमानता दूर करण्याचा एक चांगला मार्ग आहे.[९]

**८. ब्रेड लेबर कायदा –**

गांधीजीनी ब्रेड लेबरचा कायदा स्पष्ट करताना गांधीजीचा असा विश्वास होता की, शारीरिक श्रमशिवाय कोणालाही अन्न मिळविण्याचा अधिकार नाही. प्रत्येकाने आपल्या भाकरीसाठी स्वत: मेहनत घेणे आवश्यक आहे. त्यामुळे अन्नाची कमतरता भासणार नाही व लोकांचे आरोग्य उत्तम राखण्यास मदत मिळेल.

**९. लोकसंख्या –**

गांधीजीना भारताच्या वाढत्या लोकसंख्येची व उद्भवणाऱ्या वाढत्या समस्याची जाणीव असल्याचे दिसते. लोकसंख्या वाढीमुळे भारतातील लोकांना अनेक आर्थिक समस्यांचा सामना करावा लागणार असल्याचे भाकीत गांधीजी यांनी केले असल्याचे दिसते. यावर उपाय म्हणून त्यांनी 'स्वनियत्रण' किवा 'ब्रह्मचर्य' या सारख्या उपाययोजना सुचविल्या. कृत्रिम पद्धत भारतामध्ये वापरल्यास त्याचा चुकीचा वापर होईल असे त्यांचे मत होते.

**१०. प्रतिबंध –**

गांधीजी यांच्या मते, चहा, कॉफी, तंबाखू, मद्य यातून समाजाचा ऱ्हास होतो. या वस्तूच्या उपभोगातून व्यक्तीचे मानसिक, नैतिक, शारीरिक तसेच आर्थिक नुकसान घडून येते. त्यामुळे अश्या बाबिवर प्रतिबंध असायला पाहिजे. मादक पदार्थाच्या सेवनामुळे आरोग्यावर विघातक परिणाम तर होतातच शिवाय सामाजिक स्वास्थ ही नाहीसे होते.

**११. कामगार –**

गांधीजीची भारतातील नेते म्हणून सुरवातच ही अहमदाबाद 'गिरणी कामगार संपातून' झाली. गांधीजीनी कामगाराच्या कल्याणावर अधिक भर दिला. ९ जून १९४६ च्या 'हरिजन साप्ताहिकामध्ये' ते लिहतात की, 'सर्व कामगारांना समान काम व समान वेतन मिळावे.' प्रत्येक मंजुराला स्वतंत्र स्वच्छ घर, मन-शुद्ध आत्मा यांची हमी मिळावी'

त्यांच्यामते भांडवलदार हे कामगाराचे नोकर असायला हवेत, ते त्यांचे मालक असता कामा नये. त्यांनी कामगाराच्या प्रश्नाला वाचा फोडण्याकरीत कामगार संघटना असायला हवी यांचे प्रतिपादन केले. तसेच कामागारांनी आपल्या मागण्या पूर्ण करण्याकरिता अहिंसा आणि सत्यावर आधारित संप करावेत असे सुचविले.

**१२. साधेपणा –**

गांधीजी यांचे असे म्हणणे होते की, इच्छा वाढल्याने अनैतिकता, अन्याय वाढतो. जर व्यक्तीचे जीवन साधे असेल तर त्यांच्या गरजा ह्या मूलभूत आणि सीमित असतात. भौतिकवाद आणि औद्योगीकरणामुळे मानवाच्या गरजा वाढल्या आहेत. "तुमच्या कडे जेवढे कमी असेल तेवढे कमी, तुम्हाला हवे तितके चांगले, तूम्हि चांगला आहात. या जीवनाच्या आंदसाठी नाही तर आपल्या सप्राणींच्या वैयक्तिक सेवेचा आनंद घेण्यासाठी, ज्या सेवेसाठी तुम्ही स्वत:चे शरीर, आत्मा समर्पित करता आणि मन."

**निष्कर्ष –**

म. गांधीजीनी भारतीय स्वातंत्र्य लढा यशस्वी करताना आपल्या अहिंसेच्या तत्वावर भारताला एक नवीन अर्थव्यवस्थेची माहिती दिली. सध्याच्या स्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार केला असता, ज्या टप्प्यावर आपल्याला भारतीय अर्थव्यवस्था असल्याची दिसते, त्यात स्वदेशी आणि स्वालंबीपणाचा अधिक पुरस्कार करण्याची गरज असल्याचे दिसते. त्यांचे कुटीर उद्योग, खादी उद्योग, खेड्याची स्वयंपूर्णता, कमी यांत्रिकीकरण यासारख्या तत्वांचा अवलंब करण्याची सध्या खूप गरज असल्याचे दिसते.

वर्तमान स्थितीत भारताला वाढती लोकसंख्या, बेरोजगारी, आर्थिक विषमता, असमानता, अविकसित खेडी, स्थलांतर यासारख्या अनेक समस्या असल्याच्या दिसतात. याविषयी गांधीजिनी वेळोवेळी चर्चा केली असल्याचे दिसते. गांधीजीच्या आर्थिक विचाराच्या मार्गाने आपण मानवाचा सर्वांगीण विकास, संपत्तीचे योग्य वाटप, पर्यावरणीय शाश्वता, सामाजिक स्वास्थ्य यासारखी महत्वपूर्ण उद्दिष्टये साध्य करू शकतो.

**संदर्भ सूची –**

१. कूमारअप्पा, जे. सी. (२०१०), गांधीयन इकोनॉमिक थॉट" सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघट, वाराणसी. पृष्ट क्र. १०.
https://www.mkgandhi.org/ebks/Gandhian-Economic-Thought.pdf

२. कौर, अ. आणि धापली, भू. (२०१५). रिलेवयन्स ऑफ गांधीयन इकोनॉमिक थॉट : ॲन अपरिसीयल. इंटरनॅशनल जनरल ऑफ अडवांस रिसर्च इन मॅनेजमेंट ॲंड सोशल सायन्स.
https://www.researchgate.net/publication/275524627_RELEVANCE_OF_GANDHIAN_ECONOMIC_THOUGHT_AN_APPRAISAL

३. वाजगे, न. द. (२०१८). सवीनय कानूनभंग का काल मे श्रीगोंदा मे स्थित विसांपुर कारागृह का इतिहास. रिव्ह्यू ऑफ रिसर्च. ISSN: 2249-894X, खंड ७. अंक ५. पृष्ट क्र. १ ते ४.
http://oldror.lbp.world/UploadedData/5830.pdf

४. किर्लोस्कर, मो. (२०१४). द रोल ऑफ नॅच्युरल लॉ इन गाधींस् सोशल यूटोपीया सोशल सायन्स रिसर्च नेटवर्क ई-जनरल. पृष्ट क्र. २५१ ते २८७.

https://www.researchgate.net/publication/272247899_The_Role_of_Natural_Law_in_Gandhi's_Social_Utopia

५. कुमार, सू. (२०२२) "गांधीझम अँड ग्लोबलाइझेशन: ॲन आनीलिसीस." जनरल ऑफ रिसर्च इन ह्युमनिटीझ अँड सोशल सायन्स, खंड १०, अंक ६ पृष्ट क्र. ५७-६० ISSN २३२१-९४६७

https://www.questjournals.org/jrhss/papers/vol10-issue6/Ser-3/J10065660.pdf

६. वेल्लोर, भा. ल. आणी पंचिपला, गा. (२०१८). महात्मा गांधीस् व्यू ऑन कॉटेज इंडस्ट्रीज. जनरल ऑफ इंग्लीश लँगवेज अँड लिटरेचर (JOELL), खंड ५, अंक २. पृष्ट क्र. ३९-४१.

https://joell.in/wpcontent/uploads/2018/10/MAHTAMAGANDHICOTTAGEINDUSTRIES-39-41.pdf

७. मुखर्जी डी. पी. (१९५४) महात्मा गांधी व्यू ऑन मशीन अँड टेक्नॉलॉजी. इंटरनॅशनल सोशल सायन्स UNESCO खंड ६. अंक ३. फ्रान्स. पृष्ट क्र. ४११ ते ४२३.

https://unesdoc.unesco.org/ark:/48223/pf0000041390

८. सोमवंशी. म. (२०१९). महात्मा गांधी व्यू
ऑन रूरल डेवलपमेंट. इंटरनॅशनल मल्टीलीगल जनरल ऑफ कंटेपरी रिसर्च खंड
६ अंक ६ पृष्ट क्र. ८६ ते ८८ .

https://www.researchgate.net/publicaton/360440248_Mahatma_Gandhi's_Viws_on_Rural_Development#fullTextFileContent

९. कुमार, अ., ठोमर, पु. आणी दीक्षित, नि. (२०२०). गांधीयन ट्रस्टशिप – प्रीन्सिपल ऑफ सोशल वेलफेर. इंटरनॅशनल जनरल क्रिएटीव्ह रिसर्च थॉट. (JJCRT) खंड ८, अंक ४. पृष्ट क्र. १६५३ ते १६५९.https://ijcrt.org/papers/IJCRT2004220.pdf

१०. साखीया, अ. (२०१७). गांधीयन इकनॉमिक्स थॉटस् अँड इट् रिलेवन्स इन मॉडर्न इंडीया. इंटरनॅशनल जनरल ऑफ रिसर्च
इन इकनॉमिक्स अँड सोशल सायन्स. ISSN: २२४९-७३८२ खंड ७, अंक १२. पृष्ट क्र. ९६० ते ९७१.

https://www.academia.edu/35844386/Gandhian_Economic_Thought_and_Its_Relevance_in_Modern_India_by_Atul_Saikia

११. गाबे, टी. वा. (२०१९). पॉप्युलेशन कंट्रोल पॉलिसी अँड इम्प्लिमेनटेशन इन इंडिया. जनरल ऑफ सोशीओलॉजी अँड सोशल वर्क. खंड ७, अंक २, पृष्ट क्र. १३५-१४४. ISSN: २३३३-५८०७.

http://jsswnet.com/journals/jssw/Vol_7_No_2_December_2019/14.pdf

१२. शाहो, अ. आणी पटनाईक, तू. (२०१५). रिलेवन्स ऑफ गांधीयन एकॉनॉमी इन ट्वेन्टी
फस्ट सेंच्युरी. ओडिशा रिव्यु. पृष्ट क्र. २२ ते २५. ओडिशा.

१३ क्रावफोर्ड, एस. (२०१४). "विदेशी अँड द इकनॉमिक डेवलपमेन्ट ऑफ इंडिया."